क्र.२/नसचि/प्रशासक/ ०३/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०६ आक्टोंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
प्रशासक सभा क्रमांक - ०३/२०२३-२०२४
स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.०९/१०/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.१८/०९/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका क्षेत्रात नागरीकांना पाणी पुरवठा करणेकामी पाणी पुरवठा विभागासाठी ६००० लिटर क्षमतेचे २ नग वॉटर टँकर शासनाच्या GeM पोर्टल वरुन निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकूण अंदाजे र.रु.४०,७१,०१४/- मात्रचें खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.०५/१०/२०२३ चे विषयपत्र.**

३. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील स.नं.९७४ प्लॉट नं.३१ या मनपा मालकीच्या जागेमध्ये व्यापारी संकुल व प्रसुतीगृहाची इमारत बांधणेकामी यापुर्वीचे मंजूर मक्तेदार मे.रिलायन्ट बिल्डअप सांगली यांचेकडून निविदा मंजूर दराने करुन घेणेस व सुधारीत अंदाजपत्रकानुसार वाढीव रक्कमेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/१०/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४ दिनांक :- ०९/१०/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.०३ दि.०९/१०/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह,सांगली येथे सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज
३.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली	४.	श्री.वैभव साबळे –उपायुक्त, कर
५.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	६.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक
७.	श्री.सुशिलकुमार कॅंबळे - लेखापाल	८.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
९.	श्री.वैभव वाघमारे – नगररचनाकार,सांगली	१०.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड
११.	श्री.अशोक माणकापुरे- प्रशासकीय अधिकारी	१२.	श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि.
१३.	श्री.नितीन शिंदे- मालमत्ता व्यवस्थापक/कर निर्धारक,संकलक	१४.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त,प्र.स.क्र.१
१५.	श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२	१६.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
१७.	श्री.आप्पा हलकुडे - नगर अभियंता,सांगली	१८.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता
१९.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,सांगली	२०.	श्री.विनायक जाधव-ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,मिरज
२१.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली	२२.	श्री.रविंद्र ताटे – आरोग्याधिकारी,मिरज
२३.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर	२४.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक
२५.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.	२६	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.१८/०९/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक मागील सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ महानगरपालिका क्षेत्रात नागरीकांना पाणी पुरवठा करणेकामी पाणी पुरवठा विभागासाठी ६००० लिटर क्षमतेचे २ नग वॉटर टँकर शासनाच्या GeM पोर्टल वरुन निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकूण अंदाजे र.रु.४०,७१,०१४/- मात्रचे खर्चास मान्यता देणे

ज्युनि.इंजि.वर्कशॉप	दोन नग वॉटर टँकर खरेदी करणेस GeM पोर्टल निविदा मागविणेस मान्यता मिळावी.
प्रशासक	कोणत्या लेखाशिर्षातून खर्च होणार आहे.
ज्युनि.इंजि.वर्कशॉप	ई-०९९५ व ई-११२५ या लेखाशिर्षातून प्रस्तावित करणेत आले आहे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०३	महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील स.नं.९७४ प्लॉट नं.३१ या मनपा मालकीच्या जागेमध्ये व्यापारी संकुल व प्रसुतीगृहाची इमारत बांधणेकामी यापुर्वीचे मंजूर मक्तेदार मे.रिलायन्ट बिल्डअप सांगली यांचेकडून निविदा मंजूर दराने करुन घेणेस व सुधारीत अंदाजपत्रकानुसार वाढीव रक्कमेस मान्यता देणे
शहर अभियंता	नविन UDPCR नुसार वाढीव FSI मिळत असल्याने सुधारीत वाढीव खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.
मुख्य लेखापरिक्षक	बांधकाम परवाना रिवाईज करुन घ्यावा लागेल
प्रशासक	पुर्वी बांधकाम परवानगी घेतली आहे का
नगररचनाकार	बांधकाम परवाना दिलेला आहे.
प्रशासक	विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- ०९/१०/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३४ **दिनांक :- ०९/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.१८/०९/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२८ ते ठराव क्र.३३ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३५ **दिनांक :-** ०९/१०/२०२३

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.०५/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रात नागरीकांना पाणी पुरवठा करणेकामी पाणी पुरवठा विभागासाठी ६००० लिटर क्षमतेच्या एका वाहनास अंदाजे र.रु.१८,८५,५०७/- याप्रमाणे २ नग वॉटर टँकर खरेदीस र.रु.३७,७१,०१४/- तसेच ट्रान्सपोटेशन, GPS, पब्लिक एड्रेस सिस्टीम, इन्शुरन्स, आर टी ओ रजिस्ट्रेशन इत्यादी खर्चासह एकूण २ नग वॉटर टँकर शासनाच्या GeM पोर्टल वरुन निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकूण अंदाजे र.रु.४०,७१,०१४/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अति. कार्यभार

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३६ **दिनांक :- ०९/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील स.नं.९७४ प्लॉट नं.३१ या मनपा मालकीच्या जागेमध्ये व्यापारी संकुल व प्रसुतीगृहाची इमारत बांधणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.११४ दि.०४/०८/२०२३ अन्वये नविन UDPCR नियमावलीनुसार जादा FSI घेवून सुधारीत वाढीव बांधकाम करणेसाठी सदर कामाचे मंजूर मक्तेदार मे.रिलायन्ट बिल्डअप सांगली यांचेकडून वाढीव होणारे जादाचे बांधकाम त्यांचे मंजूर दराने करुन घेणेस मान्यता देणेत आलेली होती. त्यानुसार मे.पारिख ॲन्ड असोसिएटस् सांगली यांनी सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक व आराखडे तयार केले असून, सदर प्रकल्पाची किंमत र.रु. २५,८७,४०,९५७/- मात्र होत असून, त्यास तांत्रिक मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार यापुर्वीचे मंजूर मक्तेदार मे.रिलायन्ट बिल्डअप सांगली यांचेकडून त्यांचे निविदा मंजूर दराने सुधारीत अंदाजपत्रकानुसार वाढीव कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका